**पीएम गतीशक्ती नॅशनल मास्टर प्लॅन या केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी उपक्रमाकरीता समित्यांची स्थापना करण्याबाबत..एकत्रित आदेश**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : आयडीसी २०२४/प्र.क्र.१११/उद्योग-२**
मंत्रालय,मुंबई ४०००३२.
दिनांक : १२ ऑगस्ट, २०२४

**वाचा :-**

१) विशेष सचिव (लॉजिस्टीक) यांचे पत्र क्र. नॅशनल मास्टर प्लॅन/लॉजिस्टीक/२०२१, दि. २१/१२/२०२१
२) शासन निर्णय क्र. आयडीसी २०२१/प्र.क्र. ५३८/उद्योग-१४, दिनांक १३/०४/२०२२
३) मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न बैठक दि. २२/०६/२०२३ चे इतिवृत्त
४) लॉजिस्टीक विभाग, DPIIT च्या दिनांक १२/०६/२०२४ च्या ई-मेल द्वारे प्राप्त झालेल्या पीएम गती शक्ती नॅशनल मास्टर प्लॅन च्या भूमिका व जबाबदाऱ्यांचे संकलन

**प्रस्तावना:**

पीएम गतिशक्ती हा राष्ट्रीय उपक्रम केंद्र सरकारने दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी जाहीर केला आहे. सदर उपक्रम कार्यान्वित करण्यासाठी संस्थात्मक फ्रेमवर्क आणि GIS डेटा आधारित डिजिटल प्लॅटफॉर्म या दोन प्रमुख घटकांचा समावेश करण्यात आला आहे. राष्ट्रीय योजना, रेल्वे, महामार्ग, जहाजे इत्यादींसह विविध मंत्रालयांकडून पायाभूत सुविधा कनेक्टिव्हिटी प्रकल्पांचे नियोजन आणि अंमलबजावणीद्वारे मल्टी-मॉडल कनेक्टिव्हिटीसाठी प्रकल्पांना एकत्रित करण्याच्या उद्देशाने सुरु केलेला पीएम गती शक्ती हा राष्ट्रीय उपक्रम आहे. सदर उपक्रमाचे लक्ष्य जागतिक व्यापारात भारताचे स्थान मजबूत करणे, वस्तूंची सुरळीत हालचाल सुनिश्चित करणे, रोजगार निर्मिती करणे आणि गुंतवणूक आकर्षित करुन देशव्यापी आर्थिक विकासाला चालना देणे असे आहे. पीएम गतिशक्तीच्या प्रमुख सहा स्तंभामध्ये प्राधान्यक्रम, विश्लेषणात्मक, सर्वोत्तमीकरण, समन्वय, सर्वसमावेशकता आणि गतिशीलता यांचा समावेश असल्यामुळे एकात्मिक नियोजन आणि समन्वय, कार्यक्षम प्रकल्प व्यवस्थापन, आर्थिक वाढीला चालना, वर्धित कनेक्टिव्हिटी, पर्यावरण आणि सामाजिक शाश्वतता, सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) या बाबींचे व्यवस्थापन सुरळीत होण्यास मदत होणार आहे. सदर उपक्रम अपेक्षित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी गुणवत्ता सुधार योजना (Quality Improvment plan/QIP), डेटा गुणवत्तेची पुनर्रचना करणे आणि सक्षम नियोजन यंत्रणा सुनिश्चित करण्यात महत्त्वपूर्ण ठरेल. तसेच नॅशनल लॉजिस्टीक पॉलिसी २०२२ (NLP) जाहीर करण्यात आली असून, पीएम गतीशक्तीचा राष्ट्रीय मास्टर प्लॅन (NMP) सदर योजनेसाठी पूरक आहे.

सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने प्रत्येक राज्याने राज्य स्तरावरील माहिती (data) एकत्रित करुन स्टेट मास्टर प्लॅन तयार करुन सदर प्लॅन BISAG-N (Bhaskaracharya National Institute for Space Application & Geo-informatics) या GIS पोर्टल वर भरण्याबाबतच्या सूचना विशेष सचिव (लॉजिस्टीक्स), वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार यांच्या संदर्भाधीन क्र. १ च्या पत्रान्वये देण्यात आल्या. त्याअनुषंगाने दिनांक १७/०२/२०२२ रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार, पीएम गतिशक्ती नॅशनल मास्टर प्लॅनच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सचिव स्तरीय शक्तीप्रदान समिती (Empowered Group of Secretaries/EGoS), नेटवर्क प्लॅनिंग ग्रुप (Network Planning Group/ NPG), तांत्रिक सहाय्य युनिट (Technical Support Unit/TSU) संदर्भाधीन क्र. २ च्या शासन निर्णयान्वये स्थापित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये समिति सदस्यांसह त्यांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत.

२. मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२/०६/२०२३ रोजीच्या बैठकीत विविध क्षेत्रे आणि विभागांमध्ये गतिशक्ती पोर्टलच्या वापराचा अवलंब करण्यावर भर देण्यात आला तसेच दिनांक १३/०४/२०२२ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करून नवीन भागधारकांना विद्यमान संस्थात्मक फ्रेमवर्कमध्ये समाविष्ट करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या.

३. डिपार्टमेंट फॉर प्रमोशन ऑफ इंडस्ट्री अँड इंटर्नल ट्रेड (DPIIT) च्या लॉजिस्टीक विभागाने संदर्भाधीन क्र. ४ च्या संकलनाअन्वये पायाभूत सुविधांचे नियोजन आणि अंमलबजावणीसाठी दिलेल्या सूचनांनुसार विभागांच्या संबंधित

सदस्यांचा समावेश, उल्लेखित समित्यांच्या कार्यकक्षा तसेच जबाबदाऱ्यांची पुनरावृत्ती, राज्य विभागांची भूमिका, प्राधान्य प्रकल्प स्थितीसाठीचे निकष तसेच जिल्हा समन्वय समितीची स्थापना या सर्वसमावेशक बाबींचा समावेश करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तद्अनुषंगाने, मा.मुख्य सचिव यांच्या दिनांक २२/०६/२०२३ च्या बैठकीत दिलेल्या सूचना तसेच DPIIT च्या लॉजिस्टीक विभागाने संकलनानुसार दिलेल्या सूचना विचारात घेता संदर्भाधीन क्र. २ मधील शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या सुधारीत सूचना विचारात घेता याविषयी सुधारीत एकत्रित शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**<u>शासन निर्णय:-</u>**

पीएम गतिशक्ती नॅशनल मास्टर प्लॅनसाठी राज्य स्तरावर करावयाच्या कृतींच्या संबंधित सदस्यांचा समावेश, उल्लेखित समित्यांच्या कार्यकक्षा तसेच जबाबदाऱ्यांची पुनरावृत्ती, राज्य विभागांची भूमिका, प्राधान्य प्रकल्प स्थितीसाठीचे निकष तसेच जिल्हा समन्वय समितीची स्थापना करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**१) जिल्हा समन्वय समिती :-**

जिल्हाधिकाऱ्यांना नॅशनल मास्टर प्लॅन आणि राज्य मास्टर प्लॅनसह, पायाभूत सुविधांच्या नियोजनासाठी माहिती आणि साधने उपलब्ध करून देण्याकरीता एक जिल्हा समन्वय समिती स्थापन केली जाणार आहे. या समितीचा उद्देश भूसंपादन मंजुरी, युटिलिटी शिफ्टिंग समन्वय, प्रशासकीय सहाय्य इत्यादींसह समस्यांचे निराकरण करणे, प्रकल्पाची अंमलबजावणी जलद करणे, प्रशिक्षण, क्षमता बांधणी आणि BISAG-N च्या सहाय्याने लॉजिस्टिक विभागाद्वारे भू-टॅगिंग प्रदान करणे, पीएम गतिशक्ती संकलनानुसार १५ व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून मिळणारा निधी शहरी स्थानिक संस्था (Urban Local Bodies) आणि ग्रामीण स्थानिक संस्था (Rural Local Bodies) या स्तरांवर क्षमता निर्माण करणे आणि IT पायाभूत सुविधांना समर्थन देणे, गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय (MoHUA) आणि पंचायती राज मंत्रालयाने वर्धित GIS-आधारित नियोजन करणे, कार्यक्षम डेटा व्यवस्थापन, सामाजिक क्षेत्र आणि पायाभूत सुविधांच्या नियोजनासाठी वापर सुनिश्चित करण्यासाठी शहरी स्थानिक संस्था/जिल्हा परिषद स्तरावर व्यावसायिक गट स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.

जिल्हा समन्वय समिती स्थापन केल्याने जिल्हाधिकाऱ्यांकडून माहिती प्राप्त होण्याची प्रक्रिया जलद होईल तसेच प्रवेश देखील सुलभ होणार असून वरील कामांच्या तसेच प्रकल्प अंमलबजावणीसाठी तसेच समस्यांचे निराकरण जलद गतीने करण्यासाठी मदत होणार आहे. जिल्हा समित्या हया राज्य-स्तरीय उद्दिष्टांशी संरेखन आणि निरीक्षणासाठी नियमित अहवाल सुनिश्चित करण्यासाठी राज्य नोडल एजन्सीचा अविभाज्य भाग असणार आहेत. जिल्हा स्तरावर अंमलबजावणीसाठी क्षमता बांधणी, GIS आधारित नियोजन असेल. सदर अंमलबजावणीसाठी शहरी स्थानिक संस्था /जिल्हा परिषद स्तरावर व्यावसायिकांच्या सर्मपित गटाला १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत अनुदान उपलब्ध करून दिले जाईल. केंद्र सरकारच्या निर्देशानुसार जिल्हा समन्वय समितीच्या अटी पुढील प्रमाणे आहेत:-

**अ) जिल्हा समन्वय समितीच्या प्रस्तावित अटी:-**

i जिल्हा/स्थानिक स्तरावर प्रकल्प नियोजन आणि अंमलबजावणीसाठी पीएम गतिशक्तीचा अवलंब.
ii आंतर-एजन्सी समन्वय.
iii भूसंपादन मंजुरी, युटिलिटी शिफ्टिंग, समन्वय, प्रशासकीय सहाय्य इत्यादींसह प्रकल्प अंमलबजावणी संस्थांनी उपस्थित केलेल्या समस्यांचे निराकरण.
iv समिती आवश्यक डेटा प्रदान करून स्थिती अहवाल तयार करण्यासाठी नोडल एजन्सीला आवश्यक सहाय्य करेल आणि जिल्हा स्तरावर पीएम गतिशक्ती अंतर्गत सुरू असलेल्या कार्यांचा आणि कृतींच्या सद्यस्थितीचा अहवाल सादर करेल.
v. सदर समिती मासिक आढावा बैठक घेईल.
vi. सदर समिती तांत्रिक बाबींसाठी जिल्हा NIC (National Informatic Centre ) किंवा इतर यांच्याकडून तांत्रिक सहाय्य घेईल.

**ब) जिल्हा समन्वय समितीची रचना:-**

| अ.क्र | सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | जिल्हा नियोजन अधिकारी | सदस्य सचिव |
| ३ | विभागीय वन अधिकारी | सदस्य |
| ४ | मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद ग्रामविकास /त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | अतिरिक्त जिल्हाधिकारी, महसूल | सदस्य |
| ६ | आयुक्त- विकास प्राधिकरण | सदस्य |
| ७ | आयुक्त, महापालिका | सदस्य |
| ८ | जिल्हा भूसंपादन अधिकारी | सदस्य |
| ९ | जिल्हा परिवहन अधिकारी | सदस्य |
| १० | जिल्हा कृषी अधिकारी | सदस्य |
| ११ | कार्यकारी अभियंता – नॅशनल हायवे, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, ऊर्जा विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य |
| १२ | नगर नियोजन, आरोग्य, शिक्षण, खाणी, सागरी आणि IWT (Inland water transport) मधील जिल्हास्तरीय अधिकारी | सदस्य |
| १३ | महाव्यवस्थापक - जिल्हा उद्योग केंद्र | सदस्य |
| १४ | प्रकल्प अंमलबजावणी एजन्सीचे प्रतिनिधी | सदस्य |
| १५ | भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा अधिकारी सदस्य | सदस्य |
| १६ | जिल्हा माहिती विज्ञान अधिकारी (DIO)- राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्र (NIC) | सदस्य |
| १७ | अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेले पीएम गतिशक्तीच्या दृष्टीकोनातून इतर कोणतेही अधिकारी | सदस्य |
| १८ | अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेले उद्योग आणि लॉजिस्टिक सेवा पुरवठादार/संघटना यांचे प्रतिनिधी (२ ते ४) | सदस्य |

**(टिप :- जिल्हा समन्वय समितीच्या अध्यक्षांद्वारे इतर कोणत्याही सदस्याची निवड केली जाऊ शकते तसेच जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकारानुसार, जिल्हा समितीच्या स्थापनेसाठी आणि समितीच्या परिभाषित मर्यादांमध्ये तिची अंमलबजावणी करण्यासाठी नोडल एजन्सीकडून समर्थन मागवले जाऊ शकते.)**

२) **तांत्रिक सहायकता गट (Technical Support Unit):-**

- **अध्यक्ष** – मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
- **सदस्य सचिव** – सह मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
- **तंत्रज्ञान भागीदार** – MRSAC (Maharashtra Remort Sensing Application Centre)

**(टिप :- राज्य तांत्रिक सहायता गट विविध केंद्रीय/राज्य मंत्रालय विभाग, PSUs (Public Sector Undetaking) आणि प्रख्यात शैक्षणिक संस्थांतील अधिकाऱ्यांना गरजेनुसार आणि पीएम गतीशक्ती राज्य मास्टर प्लॅनच्या प्रगतीनुसार आमंत्रित करू शकते. या आधारावर विभाग तांत्रिक सहायकता गट मध्ये नोडल अधिकारी नियुक्त करतील.)**

❖ **तांत्रिक सहायता गट (Technical Support Unit ची कार्यकक्षा :-**

तांत्रिक सहायकता गट मुख्य तांत्रिक अधिकारी किंवा विषय तज्ञ, तरुण व्यावसायिक वर्गाच्या संभाव्य समावेशासह, तांत्रिक सहायकता गट तळागाळापर्यंत योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे, दर १५ दिवसांनी किंवा १ महिन्याने आढावा बैठक घेण्यास प्राधान्य देणे.

❖ **तांत्रिक सहायता गटाच्या जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे आहेत :-**

- विविध क्षेत्रीय कामांचे एकत्रीकरण करण्यात सचिव स्तरीय शक्तीप्रदान समिती (EGoS) व नेटवर्क प्लॅनिंग ग्रुप (NPG) यांना सहाय्य करणे.
- सर्व समावेशक प्रकल्प मूल्यांकन आणि शिफारसींवर अहवाल तयार करणे.
- मानक कार्यप्रणाली (SOP) नुसार MRSAC/ BiSAG-N द्वारे पीएम गतिशक्ती पोर्टलवर विभागीय डेटा अपलोड करणे.
- गुणवत्ता सुधार योजना (QIP) अंतर्गत वैयक्तिक पोर्टल, टूल्स/मोबाइल ॲप्स आणि डेटा व्यवस्थापनाच्या विकासास समर्थन देणे.
- विभागीय दृष्टीकोनातून महत्त्वाचे किंवा निर्णायक प्रकल्प ओळखणे.
- राज्ये/केंद्रशासित प्रदेशातील विभागांमध्ये प्रशिक्षण आणि क्षमता वाढीसाठी समर्थन करणे
- प्रभावी निर्णय घेण्यासाठी डेटा-आधारित विश्लेषणे हाती घेणे.
- नागरीक, वस्तू आणि सेवांच्या कार्यक्षम हालचालीसाठी परस्पर जोडलेले मल्टीमॉडल नेटवर्क वाहतूक आणि पायाभूत सुविधांचे एकत्रीकरण करणे.
- विविध क्षेत्रांमध्ये उत्पादकता वाढवण्यासाठी प्रक्रिया आणि डिजिटल माहिती सुव्यवस्थित करून मानकीकरण करणे.
- विविध आर्थिक क्षेत्रे, सामाजिक मालमत्ता, पर्यटन स्थळे इत्यादींशी मल्टीमोडल कनेक्टिव्हिटीचे एकात्मिक नियोजन करणे.

**३) नेटवर्क प्लॅनिंग ग्रुप (Network Planning Group): -**

- **अध्यक्ष** — प्रधान सचिव (उद्योग), उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग
- **सदस्य सचिव** — मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
- **सदस्य** —
  - ➢ **विभागीय नोडल अधिकारी :-**
    १. नगर विकास विभाग -प्रधान सचिव (नवि-१) यांचे प्रतिनिधी
    २. वित्त विभाग - प्रधान सचिव (व्यय) यांचे प्रतिनिधी
    ३. वित्त विभाग — सचिव (सुधारणा) यांचे प्रतिनिधी
    ४. जलसंपदा विभाग - सचिव (प्रकल्प समन्वय) यांचे प्रतिनिधी
    ५. सार्वजनिक बांधकाम विभाग — सचिव (बांधकाम/रस्ते) यांचे प्रतिनिधी
    ६. ऊर्जा विभाग - व्यवस्थापकीय संचालक, महावितरण/पारेषण/महानिर्मिती
    ७. वन विभाग — अतिरिक्त मुख्य वनसंरक्षक
    ८. गृह विभाग (परिवहन) -आयुक्त, परिवहन आयुक्त कार्यालय
    ९. कृषी विभाग -आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य.
    १०. अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग — आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य
    ११. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (वस्त्रोद्योग)- आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य
    १२. गृह विभाग (बंदरे)- मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ
    १३. सामान्य प्रशासन विभाग (विमान चालन) - व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमान वाहतूक विकास महामंडळ
    १४. सामान्य प्रशासन विभाग (माहिती व तंत्रज्ञान) - संचालक, माहिती व तंत्रज्ञान

१५. पर्यटन विभाग - व्यवस्थापकीय संचालक, पर्यटन विभाग, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ. (MTDC)

१६. महसूल विभाग - जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र

१७. सेझ - विकास आयुक्त, सिप्झ, अंधेरी, मुंबई

१८. आयुक्त, राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ

१९. आयुक्त, महापालिका प्रशासन संचालनालय

२०. आयुक्त, आरोग्य सेवा संचालनालय

२१. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई

२२. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन संचालनालय

२३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

२४. व्यवस्थापकीय संचालक रेल्वे विभाग, महाराष्ट्र रेल्वे पायाभूत सुविधा विकास महामंडळ

२५. व्यवस्थापकीय संचालक, नॅशनल हेल्थ मिशन, महाराष्ट्र (NHM)

२६. व्यवस्थापकीय संचालक - महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

२७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास प्राधिकरण महामंडळ

२८. नियोजन विभाग (जीआयएस अॅण्ड रिमोट सेन्सिंग) - संचालक, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर

**(टिप :- राज्य नेटवर्क प्लॅनिंग ग्रुप विविध केंद्रीय/राज्य मंत्रालये, PSUs (Public Sector Undetaking) विभागांचे प्रमुख/तज्ज्ञांना आमंत्रित करू शकते आणि पीएम गतिशक्ती राज्य मास्टर प्लॅनच्या आवश्यकतेनुसार आणि प्रगतीनुसार प्रख्यात शैक्षणिक संस्थांना आमंत्रित करु शकते.)**

❖ **नेटवर्क प्लॅनिंग ग्रुप (Network Planning Group) ची कार्यकक्षा :-**

पीएम गतीशक्ती नॅशनल मास्टर प्लॅन या उपक्रमाकरीता राज्यस्तरावरील माहिती (Data) एकत्रित करुन स्टेट मास्टर प्लॅन तयार करण्याकरीता संबंधित प्रशासकीय विभागाचे नोडल अधिकारी यांनी प्रशासकीय विभागाचा मास्टर प्लॅन तयार करणे व त्यासंबंधी वेळोवेळी आढावा घेणे. सदर समितीचे प्राथमिक उद्दिष्ट एकत्रित नियोजन आणि प्रस्तावांचे एकत्रीकरण आणि सचिव स्तरीय शक्तीप्रदान समिती (EGOS) ला त्याच्या आदेशासंदर्भात मदत करणे. उपलब्ध संसाधनांचा प्रभावी आणि कार्यक्षम वापर करण्यासाठी पीएम गतिशक्ती पोर्टलच्या क्षमतांचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी नेटवर्क प्लॅनिंग ग्रुप भागधारकांमध्ये नियमित संवाद साधण्यास मदत करणे, इ. असून या समितीने दर महिन्याला आढावा बैठक घेण्यास प्राधान्य द्यावे.

❖ **नेटवर्क प्लॅनिंग ग्रुपच्या जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे आहेत :-**

- राज्यातील विविध विभाग प्रस्थापित निकषांनुसार 'प्राधान्य प्रकल्प' स्थिती अंतर्गत (अ.क्र ६ मधील प्राधान्य प्रकल्प स्थितीसाठी केलेल्या निकष मध्ये संलग्न) प्रकल्पांना इतर विभागांकडून जलदगतीने मंजूरी मिळणे आवश्यक आहे आणि त्यांच्या अंमलबजावणीच्या कालमर्यादेत त्यांचे निरीक्षण करणे. तसेच त्यांना अडथळा आणणाऱ्या समस्यांचे निराकरण करणे, समितीने प्रकल्प आढावा दरम्यान इतर विभागांचे प्रतिनिधी प्रकल्पाच्या आणि आसपासच्या भौतिक आणि सामाजिक पायाभूत सुविधांमधील तफावत भरून काढण्यासाठी आवश्यक प्रकल्प ओळखण्यात सहभागी होणे, कामांची दुरुक्ती टाळणे आणि कोणत्याही प्रदेशाचा सर्वांगीण विकास होईल याची खात्री करण्यासाठी प्रकल्पानंतरचे विश्लेषण अहवाल भविष्यातील संदर्भासाठी सादर करणे.
- योग्य एकत्रीकरण सुनिश्चित करण्यासाठी निर्णायक मल्टीमॉडल कनेक्टिव्हिटी प्रकल्पांची शिफारस करणे.
- राज्य मास्टर प्लॅनमधील सर्व हस्तक्षेपांचे निरीक्षण करण्यासाठी GIS प्लॅटफॉर्म-आधारित प्रणालीचा वापर करणे.

- राज्यात चालू असलेल्या उपक्रमांचा आढावा घेणे, अंमलबजावणीतील विभागीय समस्यांचे निराकरण करणे, पीएम गतीशक्ती प्रकल्पाच्या अंमलबजावणीला तांत्रिक सहायता गटाद्वारे (TSU) समर्थन देणे.
- सचिव स्तरीय शक्ती प्रदान समितीच्या पुनरावलोकनासाठी नियतकालिक अहवाल तयार करणे.

४) **सचिव स्तरीय शक्तीप्रदान समिती (Empowered Group of Secretaries)/(EGoS): -**

- **अध्यक्ष** — मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
- **सदस्य सचिव** — प्रधान सचिव (उद्योग), उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग
- **सदस्य** —

१. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल आणि वन विभाग
२. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव (परिवहन व बंदरे), गृह विभाग
३. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, नियोजन विभाग
४. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
५. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, राज्य उत्पादन शुल्क, गृह विभाग
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग
७. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, सामान्य प्रशासन विभाग
८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव (वने), महसूल व वन विभाग
१०. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग
११. प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग
१२. प्रधान सचिव, पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग
१३. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग
१४. प्रधान सचिव (कृषी), कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग
१५. प्रधान सचिव, अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग
१६. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग
१७. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
१८. सचिव (बांधकाम/रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग
१९. सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग
२०. सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
२१. सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, वस्त्रोद्योग व पणन विभाग

**(टिप :- पीएम गतीशक्ती राज्य मास्टरप्लॅनच्या आवश्यकतेनुसार आणि प्रगतीनुसार राज्य सचिव स्तरीय शक्ती प्रदान समिती, इतर सचिव किंवा विशेष आमंत्रितांना आमंत्रित करू शकतात).**

❖ **सचिव स्तरीय शक्तीप्रदान समिती (Empowered Group of Secretaries) ची कार्यकक्षा: -**

पीएम गतीशक्ती नॅशनल मास्टर प्लॅन या केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी उपक्रमाकरीता राज्यस्तरावरील माहिती एकत्रित करुन स्टेट मास्टर प्लॅन तयार करणे, सदर प्लॅन BISAG-N या GIS पोर्टलवर सादर करण्याच्या व सदर उपक्रम राज्यात राबविण्याच्या अनुषंगाने संबंधित प्रशासकीय विभागाच्या नोडल अधिकाऱ्यामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा वेळोवेळी आढावा घेणे. राज्य मास्टर प्लॅनवर देखरेख करणे आणि सर्व क्षेत्रांमधील विकसित गरजा पूर्ण करण्यासाठी दुरुस्त्या अधिकृत करणे, संसाधनांना

अनुकूल करण्यासाठी आवश्यक हस्तक्षेपांचे मूल्यांकन करणे तसेच दर ३ महिन्यांनी आढावा बैठक घेण्यास प्राधान्य देणे.

❖ **सचिव स्तरीय शक्तीप्रदान समितीच्या जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे आहेत :-**

- राज्यभरात पीएम गतीशक्ती प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी दृष्टी, उद्दिष्टे स्थापित करणे.
- कार्यक्षमतेची खात्री करण्यासाठी धोरणात्मक योजना आणि धोरणांच्या अंमलबजावणीचे पुर्नवलोकन आणि निरीक्षण करणे.
- विद्यमान योजना आणि धोरणांमध्ये कोणत्याही सुधारणा करण्यासाठी फ्रेमवर्क आणि निकषामध्ये सुधारणा करणे.
- विहित फ्रेमवर्क आणि निकषांमध्ये विशिष्ट कृती योजनांमध्ये समाविष्ट असलेल्या प्रकल्पांमधील बदल समन्वयित करणे.
- उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योग्य दिशा निर्देश देणे तसेच धोरणात्मक योजनांच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन सुनिश्चित करुन संबंधित क्षेत्रांच्या गरजा पूर्ण करणे.
- मागणी कार्यक्षमतेने पूर्ण करण्यासाठी विशेषत: विविध क्षेत्रांच्या वाहतूक आणि लॉजिस्टिक गरजांसाठी आवश्यक हस्तक्षेप करुन अंमलात आणणे.

**५) राज्य विभागांची भूमिका:-**

प्रत्येक राज्य विभागाने त्यांच्या स्वतंत्र पोर्टलवरुन पीएम गतिशक्ती पोर्टलवर संबंधित डेटा स्तर/मालमत्ता अपलोड करणे आणि त्यांच्या संबंधित विभागांशी डेटा पीएम गतिशक्ती नॅशनल मास्टर प्लॅन (NMP) / राज्य मास्टर प्लॅन (SMP) प्लॅटफॉर्म (SOP (standard operating procedure)अंतर्गतच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार QIP (Quality Improve plan) अंमलबजावणी करणे त्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ राज्य नोडल एजन्सी म्हणून सहाय्य करेल.

- प्रत्येक विभागाला एक नोडल अधिकारी नियुक्त करणे आवश्यक आहे जो समक्रमित सहयोग सुनिश्चित करण्यासाठी नोडल एजन्सीशी संपर्क साधेल. हे नोडल अधिकारी BISAG-N द्वारे प्रदान केलेल्या समर्पित अनुप्रयोगांचा वापर करून नॅशनल मास्टर प्लॅनवर त्यांच्या विभागाच्या डेटा इनपुटचे अचूक अपलोड, एकत्रीकरण आणि मॅपिंग सुनिश्चित करण्यासाठी जबाबदार असतील. वैयक्तिक पोर्टलवरील डेटाची मालकी आणि जबाबदारी, डेटाच्या गुणवत्तेसाठी प्रत्येक विभाग जबाबदार असेल.
- BISAG-N च्या समर्थनासह प्रत्येक विभाग आवश्यकतेनुसार टूल्स आणि मोबाइल ॲप्स पोर्टलवर विकसित करू शकतात.
- पीएम गतिशक्तीच्या तत्त्वांचा रीतसर वापर करून प्रकल्प विकासासाठी पायाभूत सुविधांच्या नियोजन आणि कनेक्टिव्हिटीसाठी नॅशनल मास्टर प्लॅन/राज्य मास्टर प्लॅनचा वापर करणे.
- सर्वसमावेशक सामाजिक आणि पायाभूत सुविधांच्या नियोजनासाठी मूल्यांकन प्रक्रिये दरम्यान प्रकल्पाच्या सभोवतालच्या क्षेत्राच्या विकासाची योजना राबविणे आणि एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील प्रकल्पांचे नियोजन करताना क्षेत्र-आधारित विकासासाठी सर्वांगीण आणि एकात्मिक दृष्टीकोन स्वीकारणे.
- प्रकल्प क्षेत्रात एकसंघ आणि शाश्वत विकास साधण्यासाठी विविध विभागांमधील सहकार्याला प्रोत्साहन देणे.
- संबंधित विभाग/एजन्सी प्राधान्यक्रमासह कालबद्ध अंमलबजावणी योजना विकसित करणे.

**६. प्राधान्य प्रकल्प स्थितीसाठी निकष :-**

पीएम गतिशक्ती पोर्टल वापरण्यासाठी नियोजित केलेले प्रस्तावित प्रकल्प किंवा विभागांनी सुचविलेले प्रकल्प पूर्ण तपशीलवार प्रकल्प अहवाल (DPR) पोर्टलवर अपलोड केले जातील आणि खाली नमूद केलेल्या निकषांचे पालन करून प्राधान्य प्रकल्प स्थितीसाठी नेटवर्क प्लॅनिंग ग्रुप मार्फत मूल्यांकन केले जाईल.

| अ.क्र | प्रकल्पांचे प्रकार | सेक्टर्स | निकष | आर्थिक निकष |
|---|---|---|---|---|
| १ | भौतिक पायाभूत सुविधा | रस्ते,बोगदे, रेल्वे,पाणीपुरवठा पुल,वीज,दूरसंचार इत्यादी | **पीएम गतीशक्तीचे निकष पूर्ण करणारे प्रकल्प खालीलप्रमाणे:**<br>१. औद्योगिक उद्याने, आर्थिक क्षेत्रांना पहिल्या आणि शेवटच्या माईल कनेक्टिव्हिटी प्रदान करण्यासाठी कनेक्टिव्हिटी पायाभूत सुविधा<br>२. मल्टी मोडल कनेक्टिव्हिटी प्राप्त करण्यासाठी इंटर-कनेक्टेड इन्फ्रास्ट्रक्चर.<br>३. शहर लॉजिस्टिक योजनेचा विकास<br>४. भूसंपादनासह औद्योगिक उद्यानांचा विकास<br>५. औद्योगिक क्षेत्र, शहरे आणि ग्रामीण भागासाठी पाणीपुरवठा, ड्रेनेज, वीज, मलनिस्सारण, स्ट्रॉम वॉटर ड्रेन इत्यादींशी संबंधित मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा प्रकल्प. | रु. ३०० कोटी आणि त्याहून अधिक |
| २ | सामाजिक पायाभूत सुविधा | शिक्षण,आरोग्य खेळ, पर्यटन इत्यादी | लोकांच्या सामाजिक कल्याणाशी संबंधित, सामाजिक-आर्थिक कारण आणि परिणाम, जीवन परिणाम आणि सुधारणारे प्रकल्प हे सामाजिक कारणांशी संबंधित आहेत. | रु. १५० कोटी आणि त्याहून अधिक |
| ३ | इतर राज्य प्राधान्य प्रकल्प | सांस्कृतिक केंद्रे, युनिटी मॉल इत्यादी | सरकारच्या सांस्कृतिक आणि विशिष्ट प्रकल्पांमधून महत्त्वाचे प्रकल्प | - |

***उक्त प्राधान्य प्रकल्पांच्या प्रगती आणि स्थितीचे निरीक्षण करण्यासाठी एक समर्पित डॅशबोर्ड तयार केला जाईल**

**७.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०८१२१४४८५०६११० असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**(संजय देगांवकर)**
**सह सचिव(उद्योग), महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय,मुंबई
२. मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
३. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक, सर्व संबंधित विभाग,मंत्रालय,मुंबई
४. विकास आयुक्त (उद्योग),उद्योग संचालनालय, मुंबई
५. विकास आयुक्त, सिप्झ अंधेरी, मुंबई
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई
७. सह मुख्य कार्यकारी अधिकारी (विशेष प्रकल्प), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ,मुंबई
८. आयुक्त (वस्त्रोद्योग), महाराष्ट्र राज्य ,मुंबई
९. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य,मुंबई
१०. आयुक्त, महापालिका प्रशासन संचालनालय
११. आयुक्त, परिवहन आयुक्त कार्यालय

१२. आयुक्त, आरोग्य (NHM)

१३. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन

१४. आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य.

१५. आयुक्त, राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ

१६. आयुक्त - विकास प्राधिकरण/ महापालिका आयुक्त

१७. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई

१८. व्यवस्थापकीय संचालक, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई

१९. व्यवस्थापकीय संचालक, (जनरेशन/ट्रान्समिशन/वितरण)

२०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

२१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमान वाहतूक विकास महामंडळ

२२. व्यवस्थापकीय संचालक रेल्वे विभाग, महाराष्ट्र रेल्वे पायाभूत सुविधा विकास महामंडळ

२३. व्यवस्थापकीय संचालक, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (सिडको)

२४.व्यवस्थापकीय संचालक, पर्यटन विभाग, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ. (MTDC)

२५.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

२६. संचालक, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ऍप्लिकेशन सेंटर, मुंबई

२७.मुख्य कार्यकारी अधिकारी (बंदरे), महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड

२८. अतिरिक्त मुख्य वनसंरक्षक, वनविभाग

२९. संचालक, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ऍप्लिकेशन सेंटर

३०. संचालक, माहिती आणि तंत्रज्ञान

३३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे

३४. सर्व जिल्हाधिकारी

३५. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी

३६. मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद / ग्रामविकास सदस्य

३७. निवडनस्ती, संग्रहार्थ

Regarding roles and responsibilities of committees for PM GatiShakti National Master Plan

**Government of Maharashtra**
**Department of Industries, Energy and Labour**

Government Resolution:

Mantralaya, Mumbai -32

Date:

**Reference**: - 1. Minutes of meeting, Hon.CS review meeting dated 22/06/2023.
2. Letter from Special Secretary (Logistics) No. National Master Plan / logistics/2021, dated 21/12/2021.
3. Government Resolution: IDC 2021/Pro.No.538/Industry-14 and
4. Compendium for roles & responsibilities on PM GatiShakti Nation Master Plan issued by DPIIT

## Introduction

PM Gatishakti is a national initiative announced by the central government on October 13, 2021. Institutional framework and GIS data based digital platform are two major components to implement the initiative. PM Gati Shakti is a national initiative launched with the objective of aggregating projects for multi-modal connectivity through planning and implementation of infrastructure connectivity projects by various ministries including National Plans, Railways, Highways, Ships etc. The objective of the initiative is to strengthen India's position in global trade, ensure smooth movement of goods, generate employment and boost countrywide economic development by attracting investment. The key six pillars of PM dynamics include prioritization, analytical, optimization, coordination, inclusiveness and mobility, leading to integrated planning and coordination, efficient project management, promotion of economic growth, enhanced connectivity, environmental and social sustainability, public-private partnership (PPP) management. It will help to be smooth. The initiative will be instrumental in ensuring quality improvement plan (QIP), data quality restructuring and efficient planning mechanism to achieve the desired objectives. Also the National Logistics Policy 2022 (NLP) has been announced and the National Master Plan (NMP) of PM Gati Shakti is complementary to the said plan.

In accordance with the said project, every state should compile state level data and prepare a state master plan and upload the said plan on BISAG-N (Bhaskaracharya National Institute for Space Application & Geo-informatics) GIS portal Special Secretary (Logistics), Commerce and Industry Ministry, Government of India under Reference No. 1 was given in lieu of letters. Accordingly on 17/02/2022 Hon. As per the decision taken in the meeting chaired by the Chief Secretary, the Empowered Group of Secretaries (EGoS), Network Planning Group (NPG), Technical Support Unit (TSU) are under reference for effective implementation of PM Gati Shakti National Master Plan. No. 2 have been established as per Government Decision. It defines the roles and responsibilities of committee members along with their roles.

2. Hon. In the meeting chaired by the Chief Secretary on 22/06/2023, emphasis was placed on adoption of Gatishakti Portal in various sectors and departments and instructions were given to amend the Government Decision dated 13/04/2022 to include new stakeholders in the existing institutional framework.
3. Logistics Division of Department for Promotion of Industry and Internal Trade (DPIIT) vide reference no.4 As per instructions given for planning and implementation of infrastructure under compilation concerned departments Inclusion of members, revision of terms of reference

and responsibilities of the said committees, role of state departments, criteria for priority project status and establishment of district coordination committee are suggested. Accordingly, Hon. Considering the instructions given by the Chief Secretary in the meeting dated 22/06/2023 as well as the instructions given by the Logistics Department of DPIIT as per compilation vide reference no.2 Government decision is being ratified. Amended Integrated Government Decision taking into account the revised instructions of the Central Government

**Government Resolution:**

The government approval is being given to the change the members of institutional frameworks, roles and responsibilities of the committees, role of state departments, criteria for priority project status, formulation of district coordination committees for better implementation of PM GatiShakti State Master Plan.

**1. District Coordinating Committee:**

A District Coordination Committee shall be established, providing District Officials with access to information and tools for infrastructure planning, including the NMP and SMP. This initiative aims to expedite project implementation by addressing issues including land acquisition, clearances, utility shifting coordination, administrative support etc., Training, capacity building, and geo-tagging support will be provided by the Logistics Division with assistance from BISAG-N. As per the PM GatiShakti compendium, the funding from the 15$^{th}$ Finance Commission Grants supports capacity building and IT infrastructure at the Urban Local Body (ULB) and Rural Local Body (RLB) levels. The Ministry of Housing and Urban Affairs (MoHUA) and Ministry of Panchayati Raj are urged to establish professional pools at the ULB/Zila Parishad level for enhanced GIS-based planning, ensuring efficient data management and utilization for social sector and infrastructure planning.

The district coordination committees are to be established with the following composition mentioned in the table b. This will facilitate quick and easy access to information by District Officials who will be trained to visualize data layers and use the NMP and SMP for infrastructure planning and implementation. In addition, resolution of issues including land acquisition, clearances, utility shifting coordination, administrative support etc., can be expedited and time bound project implementation can be facilitated. These District Committees will be an integral part of the State nodal agency, to ensure alignment with state-level objectives and regular reporting for oversight. For implementation at district level, capacity building, dedicated cell with a pool of professionals at ULBs/ Zilla Parishad level to augment the GIS based planning and implementation can be made available under 15$^{th}$ Finance Commission grants. The Terms of Reference of the District Coordination Committee as directed by GoI are as follows:

a) Proposed Terms of Reference of the District Coordination Committee:

i. Adoption of PM GatiShakti for project planning and implementation at District / Local level.

ii. Inter-agency coordination.

iii. Resolution of issues raised by project implementing agencies including land acquisition, clearances, utility shifting coordination, administrative support etc.

iv. This committee shall furnish requisite support to the nodal agency in preparing the status reports by providing the necessary data and shall share the status reports of district ongoing tasks and actions undertaken under PM GatiShakti at district level.

v. The said committee will meet monthly

vi. District NICs to provide technical support.

b) **Composition of the District Coordination Committee:**

| S.No | Officer | Role |
|---|---|---|
| 1 | District Collector | Chairperson |
| 2 | District Planning Officer | Member Secretary |
| 3 | Divisional Forest Officer (DFO) | Member |
| 4 | CEO - Zila Parishad / Additional Collector, Rural Development | Member |
| 5 | Additional Collector, Revenue | Member |
| 6 | Commissioner- Development Authority | Member |
| 7 | Commissioner- Municipal Commissioner | Member |
| 8 | District Land Acquisition officer | Member |
| 9 | District Transport officer | Member |
| 10 | Executive Engineer (EE)- NH, PWD, WRD, energy, DWSS | Member |
| 11 | District level officers from town planning, health, education, mines, maritime and IWT. | Member |
| 12 | General Manager- District Industries Centre | Member |
| 13 | Representatives of Project Implementing Agency(s) | Member |
| 14 | Groundwater Survey and Development Agency officer | Member |
| 15 | District Informatics Officer (DIO)- National Informatics Centre (NIC) | Member |
| 16 | District Agriculture Officer | Member |
| 17 | Any other officers from PM GatiShakti perspective, nominated by Chairperson. | Member |
| 18 | Two to four representatives from industry and logistics service provider / associations, to be nominated by Chairperson. | Member |

* Any other member may be co-opted by the Chairperson.

* At the discretion of the Collector, support can be sought from the Nodal Agency for the establishment of the District Committee and its implementation within the committee's defined constraints.

2. **Technical Support Unit (TSU)**: -

| Chairman | Member Secretary |
|---|---|
| Chief Executive Officer, MIDC | Jt. CEO (Admin), MIDC |
| Technology Partner - MRSAC | |

*State TSU may invite officers from various central /state ministries, PSUs, departments, and eminent educational institutes as per requirement and progress of GatiShakti State Masterplan. On basis of this departments shall nominate nodal officers to the TSU.

TSU Comprising head technical officers or Subject Matter Experts (SMEs)/Domain Experts (DEs), along with the potential inclusion of Young Professionals, the TSU ensures effective scheme implementation at the grassroots level, with the determination of officer requirements

left to the discretion of departments. A review meeting every 15 days or 1 month is preferred. The detailed responsibilities are as follows:

- Assist the Empowered Group of Secretaries (EGoS), National Planning Group (NPG) in integrating various sectoral works.
- Comprehensive project appraisal and preparation of reports on recommendations.
- To upload the departmental data on PM GatiShakti portal through MRSAC/ BiSAG-N as per the Standard Operating Procedure (SOP).
- Support the development of individual portals, tools/mobile apps, and data management under Quality Improvement Plan (QIP).
- Identify projects, which are vital or critical from the departmental perspective.
- Support the training and capacity building across line Departments in the States/UTs.
- Undertake data-based analytics for effective decision making.
- Integration of interconnected multimodal network transport and infrastructure for efficient movement of people, goods, and services.
- Standardization through streamlining of processes and digital information for increasing productivity across different sectors.
- Integrated planning of multimodal connectivity to various economic zones, social assets, tourism spots, etc.

**3. Network Planning Group (NPG)**: -

NPG comprises of head of the departments / organizations of the state government, with the primary objective of unified planning and integration of the proposals and assist the EGOS in respect of its mandate. NPG will facilitate regular interactions between the stakeholders to maximize the utilization of the PM GatiShakti portal's capabilities for effective and efficient ultilisation of the available resources. A review meeting every month is preferred. The detailed responsibilities are as follows:

- **Project Appraisal:** Various departments of the state identify projects for consideration under **'Priority Projects'** status according to established criteria (Discussed under No.6). These projects shall have fast-tracked approvals from other departments and are monitored throughout their implementation timelines and resolving the issues hindering them. The committee should ensure that during project appraisal, representatives from other departments participate in identifying essential projects to bridge the gaps in physical and social infrastructure in and around the project, avoid duplication of works and holistic development of any region. To ensure that, a post-project analysis reports are to be submitted for future reference.
- **Critical Projects Recommendations:** Recommend critical multimodal connectivity projects, even those not recommended by any specific sector, to ensure proper integration.
- **Monitoring via GIS:** Utilize the GIS platform-based system to monitor all interventions within the Master Plan.
- To review ongoing activities, resolving departmental issues in implementation, support execution (via TSU) of PMGS project in the state
- To prepare periodic reports for EGOS review.

**Network Planning Group (NPG) :-**

| Chairman | Member Secretary |
|---|---|
| P.Sec (I), Industries Power and Labor Department | Chief Executive Officer, MIDC |

| S.No | Member |
|---|---|

| | |
|---|---|
| 1 | Representative of Principal Secretary, Urban Development Department (UD-1) |
| 2 | Representative of Principal Secretary (Expenditure), Finance Department |
| 3 | Representative of Secretary (Reforms), Finance Department |
| 4 | Representative of Secretary (Project Coordinator), Water Resources Department |
| 5 | Representative of Secretary (Construction/Roads), Public Works Department (PWD) |
| 6 | Managing Director, (Generation/Transmission/Distribution) |
| 7 | Additional Chief Conservator of Forests, Forest Department |
| 8 | Commissioner, Transport Commissioner's Office |
| 9 | Commissioner (Agriculture), Commissionerate of Agriculture, State of Maharashtra. |
| 10 | Commissioner, Food Civil Supplies and Consumer Protection Department |
| 11 | Commissioner, Department of Co-operation, Marketing and Textiles (Textiles) |
| 12 | Chief Executive Officer Ports (Home Department), Maharashtra Maritime Board |
| 13 | Managing Director, Maharashtra Aviation Development Corporation |
| 14 | Director, Department of General Administration (Information & Technology) |
| 15 | Managing Director, Department of Tourism, Maharashtra Tourism Development corporation. (MTDC) |
| 16 | Settlement Commissioner and Director, Land Records, Maharashtra |
| 17 | Development Commissioner, SEEPZ |
| 18 | Commissioner, State Pollution Control Board (SPCB) |
| 19 | Commissioner, Directorate of Municipal Administration |
| 20 | Commissioner, Health Department |
| 21 | Metropolitan Commissioner, MMRDA |
| 22 | Commissioner, Food and Drug Administration |
| 23 | Managing Director, Maharashtra State Roads Development corporation |
| 24 | Managing Director Railway Division, Maharashtra Railway Infra. Development Corp. |
| 25 | Commissioner, Health (NHM) |
| 26 | Managing Director - Maharashtra Metro Rail Corporation Limited. |
| 27 | Managing Director, Maharashtra - State Infrastructure Development Corporation |
| 28 | Director, Maharashtra Remote Sensing Application Center |

*State NPG may invite heads/experts from various central /state ministries, PSUs, departments, and eminent educational institutes may be invited as per requirement and progress of GatiShakti State Masterplan.

## 4. Empowered Group of Secretaries (EGoS): -

EGoS comprise of secretaries of the departments, overseeing the Master Plan and authorizing amendments to address evolving needs across all sectors, the EGoS will assess necessary interventions to optimize the resources utilized with the demands of diverse Ministries spanning various sectors. It is preferred to have a review meeting every 3 months.

- **State Master Plan:** To establish vision, goals and objectives for implementation of the PMGS project across the state.
- **Implementation Review:** Review and monitor the implementation of strategic plans and policies to ensure efficiency.
- **Framework and Norms:** Adopt a framework and norms for undertaking any amendments to existing plans and policies.
- **Project Coordination**: Coordinate changes in projects included in specific action plans within the prescribed framework and norms.
- **Directive Issuance**: Issue appropriate directions to achieve objectives and ensure compliance with guiding principles of strategic plans, addressing the requirements of relevant sectors.
- **Demand-Side Interventions:** Identify and implement interventions required to meet demand efficiently, particularly for the transport and logistics needs of various sectors.

**Empowered Group of Secretaries (EGoS): -**

| Chairman | Member Secretary |
|---|---|
| Chief Secretary, Government of Maharashtra | P.Sec, Industries Power and Labor Department |

| S.No | Member |
|---|---|
| 1 | ACS (Revenue), Revenue and Forest Department |
| 2 | ACS (Transport and Ports), Home Department |
| 3 | ACS/ P.Sec/Sec., Planning Department |
| 4 | P.Sec (Energy), Department of Industries, Energy and Labour |
| 5 | P.Sec, State Excise Duty Department |
| 6 | P.Sec, Public Health (PH-I) |
| 7 | P.Sec, General Administration Department |
| 8 | P.Sec, (Relief and Rehabilitation), Revenue& Forest Department |
| 9 | P.Sec (Forest), Revenue and Forest Department |
| 10 | P.Sec, Urban Development (I) |
| 11 | P.Sec (Expenditure), Finance Department |
| 12 | P.Sec, Environment and Climate Change Department |
| 13 | P.Sec, Information and Technology Department |
| 14 | Secretary (Agriculture), Animal Husbandry & Dairy Development |

| | |
|---|---|
| 15 | Secretary, Food Civil Supplies and Consumer Protection Department |
| 16 | P.Sec, Higher & Technical Education |
| 17 | P.Sec, Water Supply & Sanitation |
| 18 | ACS, Public Works Department |
| 19 | Secretary (Project Coordination), Water Resources Department |
| 20 | P.Sec, Tourism and cultural affairs Department |
| 21 | P.Sec, Textiles, Co-operation, Marketing and Textiles Department |

* State EGoS can invite other secretary/s or special invitee/s as per requirement and progress of GatiShakti State Masterplan.

**5. Role of State Departments:**

Every state department to upload relevant data layers/ assets on the respective individual portals in PM GatiShakti portal and validate the data pertaining to their respective Departments on the PM GatiShakti National Master Plan (NMP) /State Master Plan (SMP) platforms (as per guidelines under the SOP developed for QIP) with support of state Nodal Agency (MIDC).

- Each department is required to appoint a nodal officer who will liaise with the nodal agency to ensure synchronized collaboration. These nodal officers will be accountable for ensuring accurate uploading, integration, and mapping of their department's data inputs on the NMP using the dedicated applications provided by BISAG-N. The ownership and responsibility of data on individual portals, including the quality of data, lies with individual line departments.
- Line Departments with support of BISAG-N can develop tools and mobile apps on portals, on a need basis.
- Use NMP/SMP for infrastructure planning and connectivity for project development, duly using principles of PM GatiShakti.
- Plan for the development of the surrounding area of a project during the appraisal process for comprehensive social and infrastructure planning and adopt a holistic and integrated approach to area-based development when planning projects in a particular area.
- Encourage collaboration between different departments to achieve cohesive and sustainable development in project areas.
- Concerned Departments/Agencies may develop a time-bound implementation plan, including prioritization.

**6. Criteria for the Priority projects status**

The proposed projects to be planned to use the PM GatiShakti portal or projects suggested by departments with a completed Detailed Project Report (DPR) to be uploaded on the portal and adhering to the criteria mentioned below are appraised for Priority Projects status.

| # | Type of Projects | Sectors | Criteria | Financial Criteria |
|---|---|---|---|---|
| 1 | Physical Infrastructure | Roads<br>Tunnels<br>Railways | Projects that fulfill the following PMGS project criteria: | INR 300 Cr and Above |

| # | Type of Projects | Sectors | Criteria | Financial Criteria |
|---|---|---|---|---|
| | | Water supply<br>Bridges<br>Electricity<br>Telecom, etc | 1. Connectivity Infrastructure for Providing first and last mile connectivity to industrial parks, economic zones<br>2. Inter-connected infrastructure for attaining multi modal connectivity.<br>3. Development of city logistics Plan<br>4. Development of industrial parks including land acquisition<br>5. Large scale infrastructure projects related to water supply, drainages, power, sewerages, storm water drains etc for industrial area, cities, town and rural areas. | |
| 2 | Social Infrastructure | Education<br>Health<br>Sports<br>Tourism, etc | The projects pertaining to people's social welfare, having socio-economic cause and effect, impact, and improve lives, are those associated with social causes. | INR 150 Cr and Above |
| 3 | Other State Priority Projects | Cultural Centres, Unity Malls, etc | Projects that are vital from the cultural and marque projects of the government | - |

A dedicated dashboard will be created to monitor their progress and status of these Priority Projects.

7. The said government data is available on the website www.maharashtra.gov.in of the Government of Maharashtra and its reference number is 202408121448506110. This order is being issued by attesting with a duplicate signature.

By order of the Governor of Maharashtra

SANJAY SHAMKANT DEGAONKAR

(संजय देगांवकर)
सह सचिव(उद्योग), महाराष्ट्र शासन

**Copy to:**